महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा.क्र. तंशिविकापु/आस्था ३अ/प्राचार्य आढावा बैठक/२०२१/४५८८ . दिनांक १९/१०/२०२१ 20 OCT 2021

**बैठकीची सूचना**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
शासकीय अभियांत्रिकी व
शासकीय औषधनिर्माणशास्त्र,
शासकीय तंत्र निकेतन,
पुणे विभागीय कार्यालयाचे अधिनरत,
सर्व शासकीय संस्था.

विषय :- आढावा बैठक दिनांक २९/१०/२०२१ वेळ सकाळी ०२.०० वा.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयातंर्गत येणा-या शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी, शासकीय तंत्र निकेतने पदवीका अभ्यासक्रमाच्या संचालक/प्राचार्य संस्थेतील विविध विषयांबाबतची सद्यस्थिती व कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी दिनांक २९ ऑक्टोबर २०२१ रोजी दुपारी ०२.०० वाजता आढावा बैठक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे येथे आयोजित करण्यात आलेली आहे. बैठकीची विषयसूची सोबत जोडण्यात येत आहे.

सदर विषय सूचीमध्ये नमुद केलेल्या मुद्याबाबतच्या स्वयंस्पष्ट माहितीसह संस्थाप्रमुखांनी व्यक्तीश: उपस्थित रहावे. बैठकीसाठी कोणीही अन्य अधिकारी/कर्मचारी यांना सोबत आणण्यात येवू नये.

तसेच विषय सूचीमध्ये नमुद केलेल्या मुद्याबाबतची माहिती विभागीय कार्यालयास ईमेलव्दारे ropune@dtemaharashtra.gov.in पाठविण्यात यावी व हॉड कॉपी दिनांक २५/१०/२०२१ पर्यंत हस्तदेय सादर करावी. सदर माहिती sakalmarathi font मध्ये सादर करण्यात यावी.

सोबत - विषयसूची.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

C:\Users\ropune\Desktop\bhilave.docx

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे अंतर्गत असलेल्या शासकीय पदवी अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र व शासकीय तंत्र निकेतने या मधील प्राचार्यांच्या आढावा बैठकीकरीता प्रस्तावित मुद्दे.

०१.शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये संबंधीत संस्थांच्या अभ्यासक्रमनिहाय प्रथम वर्ष पदविका यामधील प्रवेशाबाबतची सांख्यिकी माहिती, तसेच संस्थेमध्ये इतर वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची अभ्यासक्रम निहाय सांख्यिकी माहिती.

| अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता | सन २०२०-२१ मध्ये प्रवेशित विद्यार्थी संख्या | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष | उपलब्ध शिक्षक वर्ग | |
| | | | | | | |

०२.NBA च्या अनुषंगाने संस्थेची माहिती यामध्ये विद्याशाखानिहाय SAR Upload केलेल्या असल्यास, समितीकडून भेट दिल्याची माहिती व सध्याची अद्ययावत स्थिती नमुद करावी.

| अभ्यासक्रमाचे नांव | Prequalifer | एसअेआर सादर करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| | | |

०३. भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याबाबत संचालनालयाच्या दिनांक १३/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनानुसार संस्थास्तरावर राबविण्यात येणा-या विविध उपक्रमाबाबत कार्यवाहीचा तपशिल.
०४. संस्थेत सुरू असलेल्या बांधकामाची सद्यस्थिती.
०५. संस्थेच्या पीएलअे फंडातून निधी उपलब्ध करून संस्थांचे Infrastructure चे Upgradation करण्याचे दृष्टीकोनातुन संस्थानिहाय आराखडा तयार करून प्रस्ताव सादर करणे.
०६. संस्थेची उपलब्ध जागा, बांधकाम, उपलब्ध जमीनीला कुंपण आहे किंवा कसे, जागेवर अतिक्रमण असल्यास त्याबाबतची माहिती, संस्थेच्या जमीनीबाबतचे न्यायालयीन प्रकरणे याबाबतची अद्ययावत माहिती.
०७. वर्ग १ ते वर्ग ४ संवर्गातील मंजूर, भरलेली व रिक्त पदांचा पदनिहाय तपशिल.
०८. संस्थेशी संबंधीत प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे याबाबतची न्यायालय निहाय व सद्यस्थिती.
०९. संस्थावरील खरेदी प्रक्रिया शासनाच्या जीईएम प्रणालीमार्फत करण्यात येते किंवा कसे याबाबतची माहिती.
१०. संस्थेतील प्रलंबित लेखा आक्षेप. मा.महालेखाकार, पुणे/मुंबई या कार्यालयाने केलेल्या लेखा परीक्षणानुसार. तरी याबाबत सद्यस्थिती काय आहे.
११.संस्थेतील भांडार पडताळणी प्रलंबित आक्षेपाबाबत सद्यस्थिती काय आहे. यामध्ये संस्थेतील किती भांडार पडताळणी आक्षेप आहेत, यापैकी किती आक्षेपांचे अनुपालन सादर केलेले आहेत व किती संस्था स्तरावर प्रलंबित आहेत.
१२.संस्था स्तरावर प्रलंबित सेवाविषयक, आर्थिक व विद्यार्थी विषयक बाबी प्रलंबित असल्यास त्याची माहिती व प्रलंबित असल्यास कारणमिमांसा.

..................................